# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.मुमाआ/नों.क्र.२२२४४६/२०२२/४४२५/२०२६

श्री. विजय कुंदर
शिवशंकर क्रीडा मंडळ, बी.डी.डी. चाळ,
क्र.१२ व १३, डॉ.जी.एम.भोसले मार्ग,
वरळी, मुंबई-४०००१८.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा संचालक, मुंबई विकास विभाग चाळी
यांचे कार्यालय, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा संचालक, मुंबई विकास विभाग चाळी
यांचे कार्यालय, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई-४०००१८.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०६.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०३.२०२२ | -- | १२.०४.२०२२ | -- |

अपिलार्थीनी दिनांक ०८/०३/२०२२ रोजी दि.२४.१०.२०२१ व २२.११.२०२१ रोजीच्या पत्रांसंदर्भात व्यवस्थापक, विकास विभाग चाळी, वरळी, मुंबई येथील अहवालाच्या कार्यवाहीचा तपशील व इतर कागदपत्रांसंदर्भात माहिती मागितली असून माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक १२/०४/२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज व दिनांक ३०/०५/२०२२ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत. तसेच हायब्रीड अथवा ऑनलाईन पद्धतीने उपस्थित राहण्याची सुविधा असतानाही ते उपस्थित नाहीत. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीना त्यांच्या दिनांक ०८/०३/२०२२ रोजीच्या मूळ माहिती अर्जातील माहिती प्राप्त करून घेण्यास स्वारस्य नसल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल क्र.४४२५/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**
**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०१-०६-२०२६**

Jyotsna